# 'मटा' मैफलीत साहित्याची मेजवानी

**पुणे :** 'महाराष्ट्र टाइम्स'च्या वर्धापनदिनानिमित्त सुरू असलेला उत्सव आता अधिक तरल होतो आहे. कार्निव्हल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतचा संवाद, 'स्वरझंकार'ची सुरेल मैफल आणि आता साहित्यरंगी रंगणारी मटा 'मैफल'! येत्या शनिवार आणि रविवारी (१७ आणि १८ जानेवारी) डेक्कन जिमखान्यावरील गोखले इन्स्टिट्यूट येथे दिग्गज साहित्यिकांच्या उपस्थितीत ही मैफल सजणार आहे.

या मैफलीत साहित्याचा उत्सव आणि सर्जनशीलता या विषयावर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे तसेच, ह. मो. मराठे आणि राजन खान यांची चर्चा रंगणार आहे. 'आमच्या नजरेतून आजचे साहित्य' या विषयावर ज्येष्ठ समीक्षक आणि साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष प्रा. द. भि. कुलकर्णी, 'अंतर्नाद'चे संपादक भानू काळे, ख्यातनाम समीक्षक संजय भास्कर जोशी आणि प्रा. रेखा इनामदार-साने भाष्य करणार आहेत. 'मराठी साहित्य खपाऊ नाही काय?' या विषयावर प्रदीप चंपानेरकर, देवयानी अभ्यंकर, प्रा. मिलिंद जोशी, रमेश राठीवडेकर आणि सुप्रिया लिमये यांची स्पष्ट मते जाणून घेता येतील.

प्रथितयश आणि नवोदित कवींचा काव्यकट्टा, गज़ल कार्यशाळा आणि मुख्य म्हणजे साहित्यिकांना थेट भेटण्याची, भरपूर पुस्तके खरेदी करण्याची ही संधी आहे.

**►► आता जमवू 'मैफल'!**

**...पुणे टाइम्समध्ये**